## आदेश निशाणी क्रं. १३८ वर पारीत

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेचे आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचा अर्ज तसेच प्रतिवादी क्र. १६ ते १९ यांनी दाखल केलेले निशाणी १३९ वरील म्हणणे यांचे अवलोकन केले. इतर प्रतिवादींनी म्हणणे दाखल केलेले नाही.

३. वादी तर्फे असा अर्ज करण्यात आला आहे की, वादी क्र. १ ही मयत असुन त्यांचे वारस वादी क्र. २–अ ते २–ड हे आधीच अभिलेखावर आहेत. त्या अनुषंगाने वादी क्र. १ चे नाव वगळुन वादी क्र. १ च्या नावानंतर मयत तर्फे वारस वादी क्र. २–अ ते २–ड असा मजकुर दुरुस्ती करुन समाविष्ट करण्यासाठी प्रस्तुत अर्ज केलेला आहे. सदरची तांत्रिक दुरुस्ती ही आवश्यक असुन मुदतीमध्ये करण्यात आलेली आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, दुरुस्ती मंजुर करण्याची वादीने विनंती केलेली आहे.

४. याउलट प्रतिवादी क्र. १६ ते १९ तर्फे विधीज्ञांनी आक्षेप नोंदविलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, यापुर्वीच वादीने दावा दुरुस्त केलेला आहे व वारस अभिलेखावर घेतलेले आहेत. या अर्जासोबत मृत्युचा दाखला जोडलेला नाही. त्यामुळे, वादी मयत आहे याची खात्री होवु शकत नाही. यापुर्वी दाखल केलेला निशाणी क्र. १३६ चा अर्ज वादीने मागे घेतलेला आहे. वादी क्र. १ हे दिनांक २६/०८/२०१९ रोजी मयत झालेले असुन ९० दिवसात अर्ज करणे आवश्यक होते. प्रस्तुत अर्जाला मुदतीच्या कायद्याची बाधा येते. वादी क्र. १ विरुध्द आधीच दिनांक २६/०८/२०१९ रोजी दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे, अर्ज फेटाळण्यात यावा असे प्रतिवादी क्र. १६ ते १९ चे कथन आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दिनांक १८/१२/२०१९ रोजी वादीतर्फे पुरशिस दाखल करुन वादी क्र. १ दिनांक २६/०८/२०१९ रोजी मयत असुन त्यांचे वारस वादी क्र. २–अ वादी क्र. ४ आधीच अभिलेखावर आहेत असे प्रतिपादन करण्यात आले होते. वादीतर्फे निशाणी क्र. ९७ सोबत मृत्युप्रमाणपत्र सुध्दा दाखल

करण्यात आलेले होते. त्यावरुन असे दिसुन येते की, यापुर्वीच वादींतर्फे वादी क्र. १ मयत असल्याची बाब व मृत्युचा दिनांक न्यायालयाच्या निर्देशनास आणुन दिलेला आहे. दिनांक १८/१२/२०१९ रोजी निशाणी क्र. १ वर वादी क्र. १ च्या नावाला कंस करुन निशाणी क्र. ९६ च्या पुरशिस प्रमाणे वगळण्यात आले असे नमुद दिसुन येते.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी क्र. १ च्या नावासमक्ष मयत तर्फे वारस वादी क्र. २–अ ते वादी क्र. २–ड असे नमुद करण्याची वादी परवानगी मागत आहे. वादींतर्फे दिनांक १८/१२/२०१९ रोजी वादी क्र. १ मयत असल्याची पुरशिस दाखल करण्यात आली. त्यानंतर, दिनांक २४/०९/२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. उशिराने अर्ज दाखल करण्याचे कोणतेही कारण वादींतर्फे नमुद करण्यात आलेले नाही. प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असुन आवश्यक आहे. मात्र, त्याचवेळी वादीने २०१९ नंतर २०२५ पर्यंत दुरुस्ती संदर्भात पावले का उचलली नाहीत याचे स्पष्टीकरण अर्जामध्ये नमुद नाही. त्यामुळे, झालेल्या उशिरासाठी वादीवर खर्चाची अकारणी करणे गरजेचे ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये २५००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम भरुन दाव्यामध्ये दुरुस्ती करावी.

*[Dictated and pronounced in open Court]*

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEETALI KERUAPPA KOTHULE
Date: 2026.08.03 17:29:48 +0530

पुणे.
दिनांकः ०३/०८/२०२६

(एम. के. कोठुळे)
२रे अति. न्यायाधीश, लघुवाद न्यायालय
व सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पुणे.

**: CERTIFICATE :**

"I affirm that the contents of this P. D. F. File are same word for word as per original order/ judgment."

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : B. M. Salve (Stenographer Grade - II) |
| Name of the Court | : M. K. Kothule |
| | 2nd Addl. Small Causes Court & |
| | Jt. C.J.S.D., Pune. |
| Dictated on | : 03/08/2026 |
| Transcribed on | : 03/08/2026 |
| Judgment checked & signed | |
| by Presiding Officer on | : 03/08/2026 |
| Judgment uploaded on | : 03/08/2026 |